गोवन वार्ता

बुधवार दि. १७ फेब्रुवारी २०१६

# दोडामार्ग हळबे महाविद्यालयातील भौगोलिक माहिती कार्यशाळेला प्रतिसाद

प्रतिनिधी
गोवन वार्ता

**दोडामार्ग** : येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयामध्ये मडगाव-गोवा येथील पार्वतीबाई चौगुले महाविद्यालय व हळबे महाविद्यालयातील भूगोल विभागाच्या भौगोलिक माहिती प्रणालीचा वापर, उपयोग व करिअर संधी या विषयावर दोन दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याचे उद्घाटन दोडामार्गचे प्रख्यात उद्योजक विवेकानंद नाईक व बाबुराव धुरी यांच्या हस्ते झाले.या कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.

शनिवार, १३ व १४ फेब्रुवारी रोजी झालेल्या या दोन दिवसीय कार्यशाळेत महाविद्यालयातील भूगोल विभागातील विद्यार्थी व माजी विद्यार्थ्यासाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. चौगुले महाविद्यालयातील भौगोलिक माहिती प्रणालीचे तज्ज्ञ प्रा. सागर माळी, प्रा. डॉ.अनिल येडगे मार्गदर्शक म्हणून लाभले आहेत.

या कार्यशाळेचे उद्घाटन झाले त्यावेळी डॉ. येडगे व प्रा. माळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भौगोलिक माहिती प्रणाली हे नवे तंत्रज्ञान असून सध्या ते प्रत्येक विद्यापीठात अभ्यासले जात आहे. कारण पारंपरिक पद्धतीचा अभ्यास करून नोकऱ्या मिळण्याचे दिवस आता संपले आहेत.

जगात दिवसेंदिवस नवे तंत्रज्ञान येत आहे. हे तंत्रज्ञान विद्यार्थ्यांनि आत्मसात करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागात प्रचंड क्षमता असूनही आमचे विद्यार्थी मागे राहतात. विद्यार्थ्यांनी मानसिकता बदलणे गरजेचे आहे. यावेळी बाबुराव धुरी व विवेकांनद नाईक यांनीही विचार मांडले. पाहुण्यांचे स्वागत प्रा. दिलीप बर्वे यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.डॉ. प्रज्ञाकुमार गाथाडे यांनी तर आभार मीना कुडचिकर हिने मानले.